अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## शरद पवार गटाचे नाव ठरले, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार

**नवी दिल्ली** : राष्ट्रवादी पक्ष आणि चिन्ह अजित पवारांना मिळाल्यानंतर आता शरद पवार गटाला 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार' हे नाव मिळाले आहे. शरद पवार गटाला केंद्रीय निवडणूक आयोगाने हे नाव दिले आहे. राज्यसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हे नाव देण्यात आले असल्याची माहिती समोर येत आहे. पक्षाच्या चिन्हावर मात्र अद्याप काही निर्णय झाला नसल्याची माहिती आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि चिन्ह हे अजित पवार गटाकडे गेल्यानंतर शरद पवार गटाला नव्या नावासाठी आणि चिन्हासाठी निवडणूक आयोगाला काही पर्याय द्यायचे होते. त्यामध्ये शरद पवार गटाने नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरद पवार, नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार, नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदराव पवार ही तीन नावे दिली होती. त्यामध्ये निवडणूक आयोगाने 'नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार' म्हणजे 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार' हे नाव त्यांना दिले आहे.



शरद पवार यांच्या हातातून जो पक्ष गेला, त्यातील राष्ट्रवादी हे नाव, आणि नवीन नावात शरद पवारांचे स्वतःचे नाव हे मिश्रण या नवीन नावात दिसून येते. त्यामुळे या नावाचा पर्याय देताना हा मुद्दा लक्षात घेतला गेला असल्याची माहिती मिळत आहे.

निवडणूक आयोगाने शरद पवार गटाला स्वतंत्र गट म्हणून मान्यता दिल्यानंतर त्यांना पक्षाचे नाव आणि चिन्हाची सूचना करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर दिलेल्या पर्यायामधून शरद पवार गटाला 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार' हे नाव देण्यात आले आहे.

www.surajyadigital.com ▪ गुरुवार, दि. ८ फेब्रुवारी २०२४ ▪ ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १३० वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# 'ऑन ग्रांऊड रिपोर्ट'च ठरविणार उमेदवारीचा चेहरा

## संसदीय मंडळाच्या बैठकीनंतर निर्णय | प्रदेश पातळीवरून जाणार शिफारस

**सोलापूर/खास प्रतिनिधी**

**'ऑन ग्रांऊड रिपोर्ट'मधून दिसून आलेल्या सर्वाधिक पंसतीच्या उमेदवाराचा विचार भाजपची उमेदवारी देताना होणार असून संसदीय मंडळाची बैठक येत्या आठ-दहा दिवसात होणार आहे. त्यानंतर सोलापूरसह सर्व ठिकाणच्या उमेदवारासंबंधी निर्णय होण्याच्या हालचाली गतीमान होतील. कोणत्या मतदारसंघात कोणाला उमेदवारी द्यायची, यासंबंधीची शिफारस प्रदेश भाजपकडून राष्ट्रीय भाजपकडे जाणार आहे. तद्नंतर तिथून उमेदवारीची यादी घोषित होणार असल्याची माहिती या पक्षाच्या मुंबई स्थित अति उच्च सूत्रांकडून 'सुराज्य'ला मिळाली आहे.**



अमर साबळे



विजयकुमार देशमुख



राम सातपुते



लक्ष्मण ढोबळे



नाईक-निबाळंकर



धैर्यशील मोहिते-पाटील







विशेष म्हणजे लोकसभेसाठी नवे चेहरे देण्यासंदर्भात अद्याप निर्णय झालेला नाही. संसदीय मंडळाची बैठक झाल्यानंतर यासंबंधीचा अत्यंत महत्वाचा निर्णय होईल, अशीही माहिती प्राप्त झाली.

उमेदवार निवडण्यासंदर्भातील भाजपच्या या धोरणाच्या पार्श्वभूमीवर, सोलापूर आणि माढा या बहुचर्चित लोकसभा मतदार संघामधील इच्छुक आणि चर्चेत असलेल्या संबंधितांचा 'ऑन ग्रांऊड रिपोर्ट' प्रदेश भाजपकडे जाणार आहे. या रिपोर्टमध्ये इच्छुकांसंबंधी जे काही समाजमन असेल त्या संबंधितास भाजपच्या उमेदवारीची 'लॉटरी' लागणार आहे.

राखीव असलेल्या सोलापूर लोकसभा मतदारसंघाचा विचार करता ये राज्य सभेचे माजी खासदार पुणेरी दलित चेहरा अमर साबळे, माळशिरसचे आमदार राम सातपुते तसेच सोलापूर शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख, माजीमंत्री लक्ष्मण ढोबळे, बहुजन रयत परिषदेच्या प्रदेशाध्यक्षा आणि माजीमंत्री ढोबळे यांच्या राजकीय वारसदार कन्या कोमल साळुंके-ढोबळे या इच्छुक आणि चर्चेतील चेहऱ्यांचे रिपोर्ट कार्ड सर्व्हेक्षणाअंती प्रदेश भाजपला जाणार आहे.

शिवाय सर्वधारण प्रवर्गासाठी आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या उमेदवारीमुळे देशाच्या राजकीय पटलावर आलेल्या माढा लोकसभा मतदारसंघात उमेदवारीसाठी प्रचंड मोठा संघर्ष उभा ठाकला आहे. विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर आणि ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील यांचे पुतणे धैर्यशील मोहिते-पाटील हे इथल्या महासंग्रामात लढण्यासाठी इच्छुक आहेत. उमेदवारीच्या विषयांवरून त्यांच्या समर्थकांमध्ये मोठे घमासान सुरु आहे. या मतदार संघातदेखील सर्व्हेक्षण सुरु असून ते अंतिम टप्यात असल्याचे सांगण्यात आले. लोकसभेला निवडणूक येईल असे समाजमन ज्या उमेदवारींच्यासोबत त्या चेहऱ्याचा माढा लोकसभेचा विचार होणार आहे. त्यामुळे येथील 'ऑन ग्रांऊड रिपोर्ट' ला प्रचंड महत्त्व आले आहे.

### मोहिते-पाटील यांच्या उमेदवारीवर कटाक्ष

दिल्लीच्या तख्तावर जाण्यासाठी धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या चेहरा पुढे करत मोहिते-पाटील परिवार आणि त्यांच्या समर्थकांनी प्रचंड रान पेटविले आहे. धैर्यशील मोहिते-पाटील हा सक्षम चेहरा या मतदारसंघाचा असल्याचा प्रबळ दावा संबंधितांकडून केला जात आहे. तुलनेत, विद्यमान खासदार रणजिसिंह नाईक-निंबाळकर यांची उमेदवारीदेखील सक्षम असल्याचा दावा त्यांच्या संबंधितांकडून केला जात आहे. या प्राप्त परिस्थीत मोहिते-पाटील यांच्या उमेदवारीवारीच्या विषयावर प्रदेश भाजपचे अत्यंत बारीक लक्ष असून उमेदवारी टाळल्यास मोहिते-पाटील काय भूमिका घेऊ शकतात? भाजपला त्यांच्याकडून काय दगा फटका बसू शकतो, पक्षाचे ऐन निवडणुकांमध्ये काय नुकसान होईल, याची अत्यंत बारकाईने चाचपणी होत आहे. मोहिते-पाटील यांच्यासंबंधीचा 'ऑन ग्राऊंड रिपोर्ट' आणि मोहिते-पाटील लोकसभेला असण्याने आणि नसण्याने काय परिणाम होतील, हे पाहून माढ्याचा उमेदवार शेवटी ठरला जाणार आहे.

## संग्राम नगर येथे घरफोडी; रोख रक्कमेसह ८ लाखांचे दागिने गायब; तिघे चोरटे कॅमेऱ्यात कैद

**सुराज्य/अकलूज**

अकलूज व परिसरात दिवसेंदिवस चो-यांचे प्रमाण वाढू लागले आहे. रत्नपुरी १८ - संग्रामनगर (ता. माळशिरस) येथे चोरट्यांनी कडी कोयंडा उचकटून सोने चांदी व रोख रकमेची सुमारे सव्वा आठ लाख रुपयांची चोरी केली आहे. याबाबत ज्योतिराम वेताळ जाधव (रा. संग्राम नगर) यांनी अकलूज पोलिसात तक्रार दाखल केली आहे.

पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, दिनांक ५ जानेवारी रोजी रात्री अज्ञात चोरट्यांनी जाधव यांच्या घराच्या



किचनच्या दाराचा कडी कोयंडा उचकटून आत प्रवेश केले. त्यानंतर लोखंडी कपाटाच्या ड्राव्हरचे लॉक तोडून सोन्याचे दागिने, चांदीच्या मूर्ती व भांडी, रोख ६० हजार रूपये रक्कम असा सुमारे ८ लाख २५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. यावेळी चोरट्यांनी शेजारील घरांना बाहेरुन कड्या घातल्या होत्या. ज्योतीराम जाधव यांच्या शेजारील घराबाहेर असणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये तीन चोरटे काळ्या रंगाचे कपडे घातलेले, तोंडाला काळे कापड बांधलेले व डोक्याला टोपी घातलेले तेथून जात असताना दिसत आहेत. त्यातील एक इसम लंगडत चालत असल्याचे दिसून आले. तसेच बागेचीवाडी (ता. माळशिरस) येथील गुरुमाऊली मंदिराजवळ राहणाऱ्या राहुल माणिकराव डुंगोले यांचेही घर त्याचपद्धतीने फोडून चोरट्यांनी १२ हजारांची रोकड पळवली. या दोन्ही घरफोडीची नोंद अकलूज पोलिसात झाली. पुढील तपास सहाय्यक निरिक्षक चौधरी करीत आहेत.

## खुनाचा प्रयत्न; सोलापुरातील १८ जणांना सक्तमजुरीची शिक्षा

**सुराज्य/सोलापूर**

खुनाचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून जिल्हा व सत्रन्यायाधीश आर.एन. पांढरे यांनी तब्बल १८ जणांना ७ वर्ष सक्तमजुरी आणि प्रत्येकी १ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली. ८ वर्षे चाललेल्या या खटल्यात ३ आरोपी मयत झाले आहेत. या खटल्यात अतिरिक्त सरकारी वकील ड. अल्पना कुलकर्णी, मूळ फिर्यादीतर्फे ड. एच.एच.बडेखान तर आरोपीच्या वतीने ड.धनंजय माने आणि ड.पी .एम. ढालायत यांनी काम पाहिले.

मेहबुब उर्फ दौला इस्माईल नालबंद, रियाज उर्फ गियासौद्दीन अहमदसाब रंगरेज, मतीन मुर्तज नालबंद, अल्ताफ रफियोद्दीन वंलमपल्ली, दाऊद अब्बास नालबंद, खलील खाजादाऊद नालबंद, अ.रज्जाक महीबूबसाब मंगलगिरी, म.गौस खाजादाऊद नालबंद, झुबेर मेहमूद नालबंद, हारुन रफियोद्दीन वंलमपल्ली, म.कासीम म. शरिफ नालबंद, मैनोद्दीन म. शरिफ नालबंद, मेहमूद म.युसूफ नालबंद, फारुक अ. रज्जाक मंगलगिरी, हसन उर्फ सैफ अ. रज्जाक मंगलगिरी, आरिफ जिलानी नालबंद, इलियास अ. रज्जाक मुतवली आणि सर्फराज म.शरिफ नालबंद अशी शिक्षा झालेल्या आरोपींची नावे आहेत.



यात हकिकत अशी की, इकरारअली मशिदच्या ट्रस्टीचा वाद आपसात मिटविण्याकरीता शहर काझी यांनी दि.१ डिसेंबर २०१५ रोजी दुपारी इकरारअली मशिदमध्ये बैठक आयोजित केली होती. त्या मिंटीगसाठी फिर्यादी, साक्षीदार व आरोपी हजर होते. सदर मशिदचे आरोपी ट्रस्टी नसताना गेल्या २० वर्षापासून वर्गणी गोळा करतात, मशिदच्या जागेमध्ये बेकायदेशीर बांधकाम करतात, व त्या जागेमध्ये भाडेकरु ठेवून भाडे वसूल करतात, त्याचा त्यांनी अद्यापर्यंत हिशोब दिला नाही, अशी माहिती फिर्यादी यांनी सदर मिंटीगमध्ये दिली. त्यावेळी आरोपी यांनी फिर्यादी व साक्षीदार यांना तुम्ही हिशोब विचारणारे कोण ? असे म्हणून मारहाण करणेस सुरुवात केली. आरोपींनी विटाचे तुकडे, दगड व सळई यांने फिर्यादी जैनोद्दिन शेख, सलाऊद्दिन शेख, इमरान हवालदार, अनवर जकलेर व फिर्यादीची आई मुमताज यांना मारहाण करुन आरोपी मेहबूब उर्फ दौला नालबंद यांनी फिर्यादीचा भाऊ सलाउद्दिन यास जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने सळईने डोक्यात मारले. अशी फिर्याद फिर्यादी जैनोद्दिन शेख यांनी दिल्यावर जेलरोड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाला होता.

तत्कालीन स. निरिक्षक डी बी.राठोड यांनी गुन्हयाचा तपास करुन एकूण २१ आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. खटल्याची सुनावणी चालू असताना यातील ३ आरोपी मयत झाले होते. सदर प्रकरणात सरकार पक्षाने १० साक्षीदार तपासले. साक्षीदारांनी दिलेला पुरावा, वेद्यकिय प्रमाणपत्रे व सरकारी वकीलांचा युक्तीवाद ग्राहय धरुन वरील १८ आरोपींना न्यायालयाने ०७ वर्ष सक्तमजुरी व प्रत्येकी एक हजार दंडाची शिक्षा सुनावली.

## घराचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने पळवले

**सोलापूर** : घराचे कुलूप तोडून किचन कट्ट्यावर ठेवलेले सोन्याची कर्ण फुले, अर्धा तोळ्याचे सोन्याचे वेल व रोख रक्कम असा जवळपास ४५ हजार रुपये किंमतीच ऐवज चोरून नेला. फिर्यादी बेबी रवींद्र गेंट्याल (रा.भावना ऋषी नगर, सोलापूर) या दवाखान्यासाठी बाहेर गेले असताना, त्यांच्या घराचे लॉक तोडून घरात प्रवेश करत संशयित आरोपी चेतन बालराम गादम (रा. विडी घरकुल सोलापूर) याने ही चोरी केली. गादम याच्या विरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात कायदेशीर फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

## तुळजाभवानी मंदिर लेखाधिकाऱ्याला सहा लाखांची लाच घेताना रंगेहात पकडले

**तुळजापूर** : महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेले तुळजाभवानी देवी मंदिर संस्थान पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. मागील वर्षापासून तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या सोन्या चांदीच्या दागिन्यांचा गैरव्यवहार प्रकरणी गुन्हा नोंद असून, त्याची चौकशी सुरू आहे. त्यातच बुधवारी मंदीर संस्थानचे लेखाधिकारी शिंदे यांनी सहा लाख रुपयांची लाच घेतल्याने एकच खळबळ उडाली आहे.

कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या मंदिर संस्थानचे मुख्य लेखाधिकारी सिध्देश्वर मधुकर शिंदे यास सहा लाख रूपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले आहे. एका



शासकिय ठेकेदाराकडून केलेल्या कामाचे देयक अदा करण्यासाठी शिंदे याने १० लाख रूपयांची मागणी केली होती. पंचासमक्ष सहा लाख रूपये रोख स्वीकारताना तुळजाभवानी मंदिराच्या प्रशासकीय कार्यालयातून त्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा लावून अटक केली आहे.

तुळजाभवानी मंदिराच्यावतीने तुळजापूर शहरात तुळजाभवानी सैनिकी विद्यालय चालविले जाते. या विद्यालयाच्या संरक्षण भिंतीसह प्रवेशद्वाराच्या बांधकामाचा ठेका सोलापूर येथील एका शासकीय कंत्राटदाराला मिळाला होता. तीन कोटी ८८ लाख रूपयांचे हे एकूण काम होते. ९० टक्के बांधकाम जवळपास पूर्ण झाले आहे. त्यामुळे दोन कोटी रूपयांपेक्षा अधिकच्या देयकाची रक्कम तपासणी करून मंजुरीस पाठविण्यासाठी, जमा करण्यात आलेली अतिरिक्त सुरक्षा रक्कम ३४ लाख ६० हजार रूपये परत मिळवून देण्यासाठी १० लाख रूपये लाचेची मागणी केली होती.

## चळे येथे शेतात आग लावली; ३ महिलांसह ७ जणाविरुद्ध गुन्हा

**सोलापूर** : शेत जमिनीचा वाद न्यायप्रविष्ट आहे. तुम्ही शेतात नांगरणी करू नका. असे सांगितल्याच्या कारणावरून एका महिलेस धमकी देत आग लावल्याने लाकडे जळून २ हजाराचे नुकसान झाले. ही घटना चळे (ता.पंढरपूर) येथे मंगळवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात पंढरपूर तालुक्याच्या पोलिसांनी ३ महिलासह ७ जणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या संदर्भात अनिता राजेंद्र पंडित (रा. चळे, ता.पंढरपूर) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी राजेश कुंभार त्याचे दोन भाऊ उत्तम कुंभार, राहुल कुंभार, सुभद्रा वसंत कुंभार, रेश्मा रमेश कुंभार, कल्पना उत्तम कुंभार आणि नागनाथ जोरवर (सर्व रा.चळे ता.पंढरपूर) अशा ७ जणाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

मंगळवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास अनिता पंडित या आपल्या शेतातील घरात काम करीत होत्या. त्यावेळी वरील आरोपी त्यांच्या घरासमोरील शेतात नांगरणी करीत होते. जमिनीचा वाद असताना तुम्ही जमीन नांगरू नका असे त्यांनी सांगितले. त्यावेळी तू कोण सांगणार? अशी धमकी देत उत्तम कुंभार याने घरासमोर आग लावली. त्यात सरपणासाठी ठेवलेले लाकडे जळून २ हजाराचे नुकसान झाले, असे अनिता पंडीत यांच्या फिर्यादीत नमूद आहे. हवालदार चंदनशिवे पुढील तपास करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आज काल यांचे कशातच लक्ष नाहिये!

कल्याण
770-45-159

मुंबई
467-72-570

## राज्यातील पाच हजार एसटी बस डिझेलऐवजी एलएनजीवर धावणार

### मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार

**सुराज्य/मुंबई**

**राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) पाच हजार डिझेल बसगाड्या द्रवरूप नैसर्गिक वायू (एलएनजी) या पर्यायी इंधनावर चालणाऱ्या वाहनांमध्ये रूपांतर करण्यासाठी किंग गॅस कंपनीसोबत मंगळवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला.**





डिझेलऐवजी एलएनजी इंधनाच्या वापरामुळे तुलनेत प्रदूषणात सुमारे १० टक्के घट होण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर दरवर्षी महामंडळाच्या २३४ कोटी रुपयांची बचत होईल. प्रवाशांना किफायतशीर आणि पर्यावरणपूरक सेवा मिळेल, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत परिवहन विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, किंग गॅस कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक कुरेशी यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, महाव्यवस्थापक (भांडार व खरेदी) वैभव वाकोडे, महाव्यवस्थापक (यंत्र) नंदकुमार कोलारकर उपस्थित होते.

पुढील तीन वर्षांमध्ये सहा टप्प्यांत पाच हजार डिझेल वाहनांचे एलएनजी वाहनांमध्ये रुपांतर करण्यात येणार आहे. संपूर्ण पाच हजार बसचे रुपांतर झाल्यानंतर दरवर्षी महामंडळाच्या सुमारे २३४ कोटी रुपयांची बचत होईल, असे पराग जैन यांनी सांगितले.

राज्यातील ९० आगारांमध्ये एलएनजी इंधन भरण्याची सोय उपलब्ध करण्यात येणार आहे. एसटीकडे डिझेल इंधनावर चालणारी सुमारे १६ हजार प्रवासी वाहने आहेत. महामंडळाच्या एकूण खर्चापैकी सुमारे ३४ टक्के निधी डिझेलवर केला जातो. हरित परिवहनाची संकल्पना राबविण्यासाठी डिझेलऐवजी पर्यायी इंधन वापरण्यासाठी उद्योग विभागाने महाराष्ट्रासाठी एलएनजी या पर्यायी इंधनाचा पुरवठा करण्यासाठी किंग्स् गॅस प्रा.लि. बरोबर सामंजस्य करार केला आहे. त्यामध्ये परिवहनासाठी एलएनजीचा वापर व पुरवठा याचा समावेश करण्यात आला आहे. बसगाड्या एलएनजीमध्ये रुपांतरित करणाऱ्या कंपनीला त्याची देखभाल करावी लागणार असून त्यांच्या देखभालीचा खर्च महामंडळाकडून देण्यात येणार आहे.

## प्रशिक्षण केंद्र मैदानावर चक्कर येऊन पडल्याने पोलीस जखमी

**सोलापूर** : येथील पोलीस प्रशिक्षण केंद्राच्या मैदानावर परेडचा सराव करताना एक प्रशिक्षणार्थी पोलीस तरुण मैदानावर चक्कर येऊन पडला. बुधवारी सकाळी ही घटना निदर्शनास आली. युवराज अंकुश राठोड (वय २४, रा. पोलीस प्रशिक्षण केंद्र, केगाव, सोलापूर) असे या जखमी तरुणाचे नाव आहे.

सोलापूर शहरापासूनच जवळ सोलापूर विद्यापीठाच्या लगत केगाव येथे पोलीस प्रशिक्षण केंद्र आहे. येथे नव्यानं भरती झालेल्या पोलिसांना प्रशिक्षण देण्या येते. बुधवारी सकाळी नेहमीप्रमाणे यातील जखमी युवराज राठोड हा तरुण मैदानावर परेडचा सराव करीत होता. सकाळी पावणेआठच्या सुमारास त्याला अचानक चक्कर आली आणि तो मैदानावर कोसळला. अचानक घडलेल्या या प्रकाराने प्रशिक्षणार्थी पोलीस एकत्र जमले. त्यांनी वरिष्ठांना याबद्दलची कल्पना दिली. पोलीस उपनिरीक्षक गणेश पवार यांनी त्याला तातडीने येथील, शासकिय रुग्णालयात दाखल केले. मैदानावर पडल्याने त्याच्या हनुवटीवर जखम झाली आहे. डॉक्टरांनी तातडीने त्याच्यावर उपचार सुरु केले. त्याला आराम करण्यास सांगितले असून तो शुद्धीवर असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात आले. सिव्हील पोलीस चौकित या घटनेची नोंद झाली आहे.